I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 38-40
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोव्हिड -19 आणि आॅनलाईन शिक्षण पध्दतीचे महत्व - एक अभ्यास

**अनुश्री माहुरकर**
**नाशिकराव तिरपुडे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नागपूर.**
*Corresponding Author: anushree.mahurkar2@gamil.com

**गोषवारा -**

अचानक संपूर्ण जगावर प्रहार केला व काही कळायच्या आतच संपूर्ण जग अस्ताव्यस्त होऊन गेल.त्यातून आपला देश सुध्दा सुटला नाही. भारतात केरळ राज्यात पहिला पेशंट आढळला व तिथूनच भारताला करोनाची चाहूल लागली. त्यातही आपले महाराष्ट्र राज्य करोना बाधीतांच्या संख्येत समोर आहे. हया भयानक परिस्थिमधील संकटाला पाहून आपल्या देश्यातील पंतप्रधान व राज्याच्या मुख्यमंत्री हयांनी मिळून एकमताने करोनावर उपाय शोधून काढला. करोना विषाणू हा संसर्गजन्य असल्यामुळे त्याचा संसर्ग रोखण्यासाठी 'लाॅकडाऊन' हा उपाय शोधून काढला. हयात सर्व बाजार,दुकाने तसेच सर्व शाळा व महाविद्यालयही बंद करण्यात आले. शाळा सोडल्यातर महाविद्यालयांच्या ऐन परीक्षेच्या तोंडावर लाॅकडाऊन झाले व विद्यार्थांच्या उरलेल्या अभ्यासक्रम, असाईमेंट हे अर्धवट राहीले. संपूर्ण शिक्षणक्षेत्रा समोर हे पूर्ण करण्याच आव्हान समोर आल. तेव्हा अश्या परिस्थितीतही स्तब्ध न बसता विद्यार्थांना ई-लर्निग अध्यापन देऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान न होऊ देण्याचा उत्तम उपाय शिक्षणक्षेत्राने घेतला. हयात ज्यांना तंत्रज्ञानाचे ज्ञान त्यांना आधीपासूनच आहे त्यांना काही नवीन शीकून त्यांना आपल्या ध्यानात भर पाडण्याचा फायदा झाला. पण ज्यांना तंत्रज्ञानाबद्दल पुसटशी माहिती आहे त्यांना अथक प्रयत्न करावे लागले व त्यांचा मात्र तोटा झाला.एकंदरीत ई-लर्निग अध्यापनाचे जेवढे फायदे आहेत तेवढे तोटे ही आहेत. पण कोव्हिड सारख्या संकटातही तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान न होण्यासाठी ई-लर्निग अध्यापन देऊन वेळेचा सदुपयोग करून विद्यार्थांच्या ज्ञानात भर पाडली. त्यामुळे ई-लर्निग हा उपाय निश्चितच शिक्षणक्षेत्रात फायदेमंद ठरू शकतो.

Key words: -

**प्रस्तावना -**

कोव्हिड-19 साथीच्या रोगाचा संसर्ग टाळण्यासाठी लाॅकडाऊन कराव लागल हया पाश्र्वभुमिवर सर्व शाळा, महाविद्यालय बंद ठेवाव्या लागल्या अश्यावेळी परीक्षा समोर आल्यावर सर्व बंद कराव लागल. अश्यावेळी सर्वच क्षेत्राप्रमाणे शिक्षणक्षेत्रावरही हयाचा भयंकर परिणाम झाला आहे .पण हया संकटातही विद्यार्थांचे होणारे नुकसान वाचवण्यासाठी तसेच त्यांचे भविष्य घडविण्यासाठी वर्तमानातच त्यांच्या शिक्षणाची काळजी घ्यावी लागेल कारण 'वर्तमानावर भविष्य अवलंबून असते.' हयाकरिता हया महामारीच्या संकटात विद्यार्थांचे शिक्षणसत्र पूर्ण होण्यासाठी ई-लर्निग अध्यापनाचा सहारा घेऊन शिक्षणक्षेत्र विद्यार्थी व त्यांच्या पालकांची दुर करण्याचा प्रयत्न करत आहे. हया लाॅकडाऊन मध्ये सर्व शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व प्राध्यापक आपआपल्या विषयासंबंधीचे पाठ आॅनलाईन पध्दतीने विद्यार्थी पर्यंत पोहचवून त्यांचा अपूर्ण अभ्यासक्रम व पुढील क्षेत्रातील अभ्यासक्रमाबद्दल माहिती देण्यासाठी ई-लर्निग अध्यापन पध्दतीचा उपयोग करत आहे. व त्यासाठी शिक्षक व प्राध्यापक तंत्रज्ञानाची संपूर्ण माहिती अवगत करत आहे. सुरवातीला दुरस्त शिक्षणात पत्र व फोनचा वापर केला जात असे पण आज काही वर्षापासून शिक्षणात तंत्रज्ञानातील इंटरनेट,संगणक, मोबाईल, स्कॅप हया सारख्या क्रियाशिल साधनांचा वापर ई-लर्निग अध्यापन मध्ये होतो. हयावरून ई-लर्निग म्हणजे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून झालेली अध्यापन -अध्ययन प्रक्रिया होय. तसेच ही सहज व आनंदाने आत्मसात होणारी शिक्षण पध्दती आहे. शिवाय हया परिस्थितीत वेळेचा सदुपयोग करून शिक्षण प्रक्रिया पूर्ण

होत आहे.व ही प्रक्रिया सोशल अंतर ठेऊन करोना सारख्या महामारीपासून बचावही होत आहे.इतर शाखांप्रमाणे शारीरिक शिक्षण महाविद्यालयात बाहेरील राज्यातील अनेक विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात.त्यामुळे ई-लर्निंग अध्यापन पध्दती फार उपयागी व महत्वाची आहे.

ई-लर्निंग अध्यापनातील क्रियाशील साधने -

ई-लर्निंग अध्यापन पुढील साधनांव्दारे होऊ शकते.

1 मोबाईल: मोबाईल हे एका हाताच्या मुठीत मावेल असे साधन आहे. ज्यात सर्वप्रकारचे तांत्रज्ञान दडुन बसले आहे. ज्यामुळे अध्यापन-अध्यायन प्रक्रिया सहज व आनंदाने होते. शिवाय हे सहज कुठेही व कधीही नेता येते. त्यामुळे शिक्षणासाठी हे महत्वाचे साधन आहे.जसे-अभ्यासक्रमातील एखादया विषयांची माहिती, खेळाची व्हिडीओ क्लिप, किंवा पाठातील भाग व्हाटसअप, युटूयूब किंवा गुगलच्या माध्यमातून विद्यार्थांपर्यंत शिक्षणाचे ज्ञान पोहचवता येते.

2 संगणक: संगणक तंत्रज्ञानाचे मोठे व उपयुक्त साधन आहेहयाव्दारे शिक्षणातील बारकावे तांत्रीकज्ञानाव्दारे विद्यार्थापर्यंत पोहचवता येते. जसे- पाठयक्रमातील शैक्षणिक लेसन, मैदानी खेळ, मैदानाबद्दलची माहिती,योग्याभ्यासाची माहिती हयात सहज साठवून ठेवता येते.

3 ध्वनिफित: ई-लर्निंग अध्यापनाचे हे ही एक साधन आहे.ज्याव्दारे अभ्यासक्रमाच्या शिवाय काही नवीन पण महत्वपूर्ण माहितीची ध्वनिफित तयार करून ती विद्यार्थांना पाठवून त्यांना अध्यापनात मदत करता येऊ शकते. हया शिवाय आधुनिक खेळ किंवा खेळाडुंच्या शैली हया विषयीचे ज्ञान ही त्यात देता येते.

4 फिल्म: ई-लर्निंग अध्यापनाच्या हया साधनात अभ्यासक्रमावरील पाठाची माहिती संक्षिप्त रूपात काढून त्याची शार्ट फिल्म तयार करून विद्यार्थांना ते प्रोजेक्टरवर दाखवता येऊ शकते.जसे-एखदया खेळाडूंच्या जीवनावर फिल्म तयार करून किंवा खेळाविषयी माहिती पट तयार करून त्या व्दारे विद्यार्थांना प्रभावित केल्या जाऊ शकते.

5 स्काईपचा वापर: व्हच्युअल ट्रिप,फिल्म ट्रिप,व्हिडीओ कॉन्फरिंग, फाईल शेअरिंग आणि स्क्रिन शेअरिंग अशा काही लोकप्रीय स्काईप आहेत. हयाच्या माध्यमातून शिक्षणक्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना स्काईपचा उपयोग शिक्षणासाठी करता येतो.

ई-लर्निंग अध्यापनातील फायदे-

ई-लर्निंग हे अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत महत्वाची भुमिका निभावते.आणि त्याचे फायदे पुढील प्रमाणे आहेत.

ई-लर्निंग एक प्रभावी माध्यम: ई-लर्निंग हे अध्यापन-अध्ययन प्रक्रियेतील प्रभावी माध्यम आहे. ई-लर्निंग च्या विविध माध्यमानुसार अध्यापन करून विद्यार्थांच्या शिक्षणात प्रगती करता येते.जेणे करून विद्यार्थांचे भविष्य उज्वल होऊ शकते. त्यामुळे हे खूप प्रभावी माध्यम आहे.

विद्यार्थांसाठी आनंददायी: ऑनलाईन किंवा ई-लर्निंग शिक्षणाव्दारे शिक्षण घेतांना शालेय तसेच महाविद्यालयातील विद्यार्थांना नेहमीच्या पुस्तकी शिक्षणापेक्षा काही नवीन व वेगळ शिकायला मिळण्याचा आनंद होऊन अश्या आनंददायी व उत्साही अध्यापनाचा फायदा नक्कीच

गुंतवणुकीवर उत्कृष्ठ परतावा: एखाद विषयाचे ज्ञान ध्यायचे असल्यास प्रथम त्याला ते शिकाव लागत व ते शिकण्यासाठी त्याला शिकवणी लावावी लागते किंवा प्रशिक्षण घ्याव लागते. हया सर्वांसाठी पैसा खर्च करावा लागतो. पण ई-लर्निंग मध्ये सहज व सोपी अध्यापन होत असल्यामुळे जास्त पैसे खर्च न होता आपल्या गुंतवणुकीचा परतावा उत्कृष्टरित्या मिळतो.

अध्यापन-अध्ययनाची नाविण्य पध्दती: नेहमी प्रमाणे वर्गात बसून पुस्तक किंवा लेक्चर्स अटेंडकरून शिकण्या पेक्षा ई-लर्निंग किंवा ऑनलाईन पध्दतीतील संगणक,

**मोबाइल,इंटरनेट सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अध्यापनासाठी केला तर हया नाविण्यपूर्ण शिक्षण घेऊन तंत्रज्ञानाचा विद्यार्थी ,शिक्षक व प्राध्यापकांनाही फायदा होऊ शकतो.**

**ई-लर्निंग अध्यापनातील तोटे -**

**ई-लर्निंग अध्यापनातील फायदे आपण वरील प्रमाणे बघीतले आता हयाचे तोटे पुढील प्रमाणे आहेत.-**

**आळसी वृत्ती व व्यसन: ई-लर्निंग अध्यापन पध्दती ही जरी उत्तम व फायदेशीर असली तरी हयात जास्तीत जास्त मोबाईल चा वापर केल्या जातो. मोबाईलच्या सततच्या वापरामुळे विद्यार्थांना त्याच व्यसन लागते व मग कोणतेही दुसरे काम करायला तो तयार नसतो.त्यामुळे त्यांच्यात आळस निर्माण होतो.व हे योग्य नव्ह.े**

**प्रकृतीवर परिणाम: ई-लर्निंग अध्यापनासाठी संगणक किंवा मोबाईलचा जास्तप्रमाणत वापर केला जातो. त्यातही मोबाईल हे सहज कुठेही व केव्हाही नेता येतो व आता सर्वाकडे तो उपलब्धही आहे. त्यामुळे मोबाईलचा वापर जास्त प्रमाणात केला जातो. तसेच त्याच्या सततच्या वापराने डोळे,मान,हात व हाताची बोटे हयांच्यावर परिणाम होतो.शिवाय चिडचिड निर्माण होते.व हे शरीरासाठी धोक्याचे आहे.**

**नको ती माहिती आत्मसात करणे: ई-लर्निंग अध्यापन हे आॅनलाईन पध्दतीचे अध्यापन आहे.हयात इंटरनेटचा वापर जास्त प्रमाणात होतो.त्यात कामाव्यतीरिक्त फालतु माहिती मधे मधे येते. नको त्या जाहिराती मध्येच बघायला मिळतात. त्यामुळे अभ्यासासंबंधीची माहिती सोडून नको त्या माहितीचा साठा आत्मसात होतो.**

**वाचन व लिखाणा पासून दुर: ई-लर्निंग अध्यापन पुस्तक हातात घेऊन वाचन होत नाही, शिवाय लिखाणाचे प्रमाणही कमी प्रमाणात असते व शुध्दलेखण ही इंटरनेटवर आपोआप येते.त्यामुळे वाचन व लिखाणा पासून विद्यार्थीदुरावले जातात.**

**वरिष्ठांचा धाक नसणे: ई-लर्निंग अध्यापन प्रक्रिया ही प्रोफेसर व विद्यार्थी हयांच्यात समोरा समोर होत नसल्याने शिक्षक किंवा प्रोफेसर हयांचा धाक विद्यार्थांवर नसतो. शिवाय अध्यापन-अध्ययन प्रक्रिया उत्तमरित्या घडत नाही. शिक्षणाबाबत बरेच विद्यार्थी हे आपल्या पालकांच ऐकत नाही त्यामुळे त्यांच्यात भीती किंवा आदरयुक्त धाक राहत नाही.अश्या प्रकारे ई-लर्निंग अध्यापनातील तोटे आहेत.**

**निष्कर्ष –**

आज संपूर्ण जगात कोव्हिड 19 चा फैलाव आहे.हा छोटासा विषाणू ज्याला करोना म्हणतात त्याने आपल्या देशालाही घेरल आहे. त्यातही आपले राज्य करोना बाधीतांमध्ये अग्रेसर आहे. हया भयंकर महामारीतून समाजाचे रक्षण करण्यासाठी संपूर्ण देशात लाॅकडाऊन केले आहे. त्यामुळे शाळा, महाविद्यालयांना सुट्टया दयाव्या लागल्या. महाविद्यालयाच्या ऐन परीक्षेच्या तोंडावर सुट्टया असल्यामुळे राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी व पुढील सत्रातील शिक्षणाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आॅनलाईन पध्दती म्हणजे ई-लर्निंग व्दारे अध्यापन-अध्ययन प्रक्रिया करावी लागत आहे. हया अध्यापनाचा विद्यार्थांना बराच लाभ होत आहे. त्याचप्रमाणे शिक्षक, प्रोफेसर व विद्यार्थी हया सर्वांना तंत्रज्ञान शिकण्याची नवीन संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे अध्यापन-अध्ययन प्रक्रिया आनंदाने व उत्साहाने होत आहे. पण ज्या प्रमाणे नाण्याला दोन बाजू असतात त्याप्रमाणे ई-लर्निंग अध्यापनाचे बरेच फायदे व काहीसे तोटे ही आहेत. ज्याप्रमाणे कोव्हिड-19 च्या महाभयंकर परिस्थितीत आपण सकारात्मकतेने लढा देत आहोत त्यामुळे ई-लर्निंग अध्यापनातील तोटे न पहाता त्याचे होणारे फायदे बघितले तर हया लाॅकडाऊन मध्येही करोनाचा परिणाम कोणताही असो ई-लर्निंग अध्यापन प्रक्रिया उत्तमरित्या पार पडत आहे. हयावरून संकट कितीेतही असो किंवा परिस्थिती कशीही असली तरी त्यावर मात करण्याचे सामर्थ फक्त सकारात्मक भुमिकेतूनच येऊ शकते हे मात्र खर.

**संदर्भ ग्रंथसूची -**

1. **डब्लूए डब्लूए डब्लूए विकीपीडीया एओआरजी** **ई.लर्निगझेडपीब्लागस्पॅाटण्कॅाम**